**नोट** दिनांक २७/०७/२०२२

| | |
|---|---|
| पोलीस ठाणे | खंडणी विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई. |
| गु.र.क्र. व कलम | १०९/२०२२, कलम ३८७, १२० (ब), ५०६(२), ३४ भा.द.वि. सह ३, २५ हत्यार कायदा(पायधुनी पोलीस ठाणे, गु.र.क्र. ९००/२०२२) |
| गुन्हा घडला दिनांक, वेळ | जानेवारी २०१९ ते ०८/०९/२०२१ रोजी पर्यंत |
| आरोपी अटक | ३ इसम |
| अटक दिनांक | दिनांक २७/०७/२०२२ |
| हस्तगत मुद्देमाल | दोन मोबाईल, दोन सिमकार्ड |

**गुन्हयाची थोडक्यात हकीकत :-** यातील फिर्यादी यांनी यातील आरोपींना व्यवसायाकरिता गुंतवणूक स्वरुपात दिलेले एकूण १३ करोड रुपये (फायनान्स केलेले) फिर्यादी यांनी त्यांच्याकडे परत मागू नयेत, म्हणून गॅंगस्टर छोटा शकील याचे हस्तकांमार्फत फिर्यादीला जिवे ठार मारण्याची धमकी दिली तसेच सुरतमध्ये व्यवसाय करण्यासाठी हत्याराचा धाक दाखवून ५० लाख रूपयांची खंडणी मागितली. तसेच फिर्यादी मुंबईमध्ये असताना त्यांना एका अनोळखी आंतरराष्ट्रीय मोबाईलवरून फोन करून पैसे न मागण्यासाठी धमकावले म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

नमूद गुन्हयातील तीन आरोपींना दि. २७/०७/२०२२ रोजी सुरत, गुजरात येथून शिताफीने ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. सदर अटक इसमास मा. न्यायालयाने दि. ०३/०८/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. सुहास वारके, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. एस. वीरेश प्रभु, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. बाळसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील व.पो.नि. ज्ञानेश्वर गणोरे, पो.नि. सुनिल पवार, पो.नि. अरूण थोरात, पो.ह. संतोष सुर्वे, सुजित तावडे, पो.ना. निलेश कंद, अमोल तोडकर, कक्ष-४, गु.प्र.शा. चे पो.नि. सोनावणे, स.पो.उ.नि. साळोखे, पो.ह. ९६०००३/तळेकर, पो.शि. ०६०१५७, पो.शि. ०९००२२८ व प्रतिबंधक शाखेतील पो.शि. ०४०६८४/डुबल, पो.शि. ०४१११९/धादवड यांनी पार पाडलेली आहे.

Scanned with CamScanner